RNI No. MAHBIL/2009/31743

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार—ब

वर्ष ८, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १३-१९, २०२२/पौष २३-२९, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २०२२.

अधिसूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५.

क्रमांक वृक्षअ २०२१/प्र.क्र. ०२/तां.क. ४.— महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) याच्या कलम ३ याच्या पोट-कलम (अ-१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील अधिकाऱ्यांचा समावेश असलेले महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटीत करीत आहे :—

अ.क्र. (१)	पदाचे नाव (२	पदनाम (३)
१.	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग	पदसिद्ध अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग	पदसिद्ध सदस्य
३.	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, (वने) महसूल व वन विभाग	पदसिद्ध सदस्य

उक्त अधिनियमान्वये, उक्त प्राधिकरणाद्वारे, कर्तव्ये व कार्ये पार पाडण्याकरिता, प्राधिकरणाच्या कामाकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी संचालक (पर्यावरण), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग हा उक्त प्राधिकरणाचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल.

महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, उक्त प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व तांत्रिक सल्ला देण्यासाठी जास्तीत जास्त तीन वृक्ष तज्ज्ञांची नेमणूक करील आणि आवश्यकेतनुसार या वृक्ष तज्ज्ञांना बैठकीसाठी बोलवू शकेल.

पदसिद्ध सदस्य-सचिव किंवा वृक्ष तज्ज्ञ यांना, उक्त प्राधिकरणाचा बैठकांमध्ये मत देण्याचा हक्क असणार नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) याच्या कलम ३ याच्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे श्री. वैभव एच. राजे, यांची **“ वृक्ष तज्ज्ञ ”** म्हणून महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणावर एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. कि. निकम,
शासनाचे सह सचिव.

ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th January 2022.

NOTIFICATION

MAHARASHTRA (URBAN AREAS) PROCTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

No. Vrukshaa 2021/CR 02/TC-4.—In exercise of the powers conferred by sub-section (A-1) of section 3 of the Maharashtra (urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975 (Mah. XLIV of 1975), the Government of Maharashtra hereby constitutes the Maharashtra State Tree Authority Consisting of the following officials, namely :—

Sr. No. (1)	Name of the Posts (2)	Designation (3)
1.	Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary, Environment and Climate Change Department.	*Ex-officio* Chairman
2.	Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary, (UD-2) Urban Development Department.	*Ex-officio* Member
3.	Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary, (Forest) Revenue and Forests Department.	*Ex-officio* Member

The Director (Environment), Environment and Climate Change Department shall be the *Ex-officio* member-secretary of the said Authority to manage the affairs of the Authority to carry out duties and perform functions under the said Act by the said Authority.

The Maharashtra State Tree Authority will appoint maximum of three tree experts to provide technical advice to carry out the duties of the said Authority and can call the meeting of these tree experts as per the requirement.

The *Ex-officio* member-secretary or tree experts shall not have right to vote in the meetings of the said Authority.

In exercise of the powers conferred by sub-section (3) of section 3 of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Tress Act, 1975 (Mah. XLIV of 1975), the Government of Maharashtra hereby nominate Shri Vaibhav H. Raje as a **“ tree expert ”** on The Maharashtra State Tree Authority for the period of one year.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. NIKAM,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.